CMYK

होर्डिंग्ज लावणार असाल तर सावधान,मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अवमानाचा दाखल होऊ शकतो गुन्हा >> पान 2

जिल्ह्यात रब्बी पेरणीचा २ लाख ९८ हजार ९२४ शेतकऱ्यांनी काढला एक रुपयात पिक विमा >> पान 3

कब्रस्तान कंपाउंड वॉलचे माजी आ. संजय रायमुलकर यांच्या हस्ते उद्घाटन >> पान 4

**सुविचार**

आदर दिला तरच आपली मूल्ये आणि संस्कार टिकून राहतात.

# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



१४ दिवस कोमात होता अभिनेत्याचा मुलगा, बाहेर येताच आई-वडील नाही घेतलं थलपति विजयचं नाव

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 140 ■ बुधवार, दि. 01 जानेवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# अखेर वाल्मिक कराड शरण!

## पुण्यातील सीआयडी ऑफिसमध्ये लावली हजेरी

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी : गेल्या अनेक दिवसांपासून चर्चेत आलेला मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात सूत्रधार असल्याचा आरोप केलेला वाल्मिक कराड आज पुण्यात सीआयडीसमोर शरण आला आहे. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मीक कराड तीन आठवड्यांपासून फरार होता. या प्रकरणात आतापर्यंत चार आरोपीला अटक करण्यात आली आहे. तर तीन आरोपी फरार आहेत. त्यामध्ये वाल्मीक कराड याचेही नाव होते. वाल्मीक कराड याचा शोध सीआयडीकडून घेतला जात होता.**

### तर मी शिक्षा भोगायला तयार - वाल्मिक कराड



मी वाल्मीक कराड केज पोलीस स्टेशनमध्ये माझ्या विरोधात खोटी खंडणीची फिर्याद दाखल झाली आहे. मला अटकपूर्व अधिकार असताना मी सीआयडी ऑफिस पुणे पाषाण येथे सरेंडर होत आहे. संतोष देशमुख यांचे जे कोणी मारेकरी असतील त्यांना अटक करावी आणि त्यांना फाशीची शिक्षा द्यावी. राजकीय रोषापोटी माझं नाव त्यांच्याशी जोडले जात आहे, पोलीस तपासाचे निष्कर्ष येतील. त्यात मी जर दोषी दिसलो तर मला शिक्षा द्यावी ती मी भोगायला तयार आहे असं वाल्मीक कराड यांनी स्वतः शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये म्हटले आहे.

### सुरेश धस यांच्यासह सत्ताधारी, विरोधकांनी मुद्दा उचलून धरला



बीडमधील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणावरून आक्रमक झालेले भाजप आमदार सुरेश धस यांनी बीडच्या गुन्हेगारीवरती बोट ठेवलं. त्यांनी हे प्रकरण सुरवातीपासून लावून धरलं होतं, तर त्यानी हिवाळी अधिवेशनावेळी देखील आपली मते आक्रमकपणे मांडली होती. तर वाल्मिक कराडला वाल्मिक अण्णा म्हणून बीड तालुक्यामध्ये ओळखले जाते. मात्र वाल्मिक कराड यांच्याशिवाय धनंजय मुंडे यांचे पानदेखील हालत नाही', हे विधान स्वत: पंकजा मुंडे यांनी एका भाषणात केले होते. भाजप आमदार सुरेश धसही जाहीरपणे बोलले आहेत.



बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचे ९ डिसेंबर २०२४ रोजी अपहरण झालं त्यानंतर त्यांची त्यांची निर्घृणपणे हत्या करण्यात आली. या हत्येचे पडसाद राज्यभरात उमटले. संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर आरोपींना अटक झाली नाही म्हणून गावकऱ्यांनी आणि कुटूंबाने आंदोलने केली. या हत्या प्रकरणाचा लवकरात लवकर तपास करुन आरोपींवर कारवाई करण्याची मागणी केली होती. नुकत्याच पार पडलेल्या विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनातही हा मुद्दा गाजला होता. हा मुद्दा बीडच्या खासदारांनी दिल्लीमध्ये हिवाळी अधिवेशनावेळी मांडला. त्याचबरोबर बीडचे खासदार बजरंग सोनावणे यांनी या प्रकरणी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली होती.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाचा तपास सीआयडीकडे सोपवण्यात आल्याचं सांगितलं होतं. त्याचबरोबर या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल, असं म्हटलं होतं. या प्रकरणामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय असलेले वाल्मिक कराड यांचं नाव आलं, त्यांना राजकीय संरक्षण असल्याचा दावा देखील अनेक नेत्यांनी केला होता, त्यानंतर राजकीय वर्तुळात मोठ्या प्रमाणावर आरोप-प्रत्यारोप झाले, तर धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी झाली. धनंजय मुंडे यांनी वाल्मिक कराड माझ्या जवळचे आहेत. संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणात जे दोषी असतील त्यांना फाशी द्या, असं म्हटलं होतं.

दरम्यानच्या काळात वाल्मिक कराड यांची पत्नी आणि त्यांच्या संपर्कातील काही जणांची सीआयडीकडून चौकशी करण्यात आली. तर काहींच्या मालमत्तेवर टाच आणण्यात आली. काही आरोपींची मालमत्ता जप्त करण्यात आली, कराड फरार असताना त्याच्या पत्नीची देखील चौकशी झाल्याची माहिती आहे.

**कराडच्या आत्मसमर्पणावर काय म्हणाली वैभवी देशमुख?**

माझ्या वडिलांना लवकरात लवकर न्याय मिळाला पाहिजे, इतके दिवस झाले पोलीस यंत्रणा काम करते आहे. पण त्यांना इतका वेळ का लागत आहे, ते गुन्हेगार असतील तर ते स्वतः सरेंडर होत आहेत. तर मग इतके दिवस पोलीस यंत्रणा काय करत आहे. त्यांना पकडण्यासाठी इतका वेळ लागत असेल तर, आम्ही न्यायाच्या पेक्षा कधी करायची. आम्हाला न्याय कधी मिळणार माझी एकच मागणी आहे. ज्यांनी माझ्या वडिलांची क्रूरपणे हत्या केली. जे तीन आरोपी फरार आहेत, लवकरात लवकर अटक करावी नुसार आणखी ज्या आरोपी आहेत, त्यांनाही ताब्यात घ्यावं, कारवाई करावी आणि माझ्या वडिलांना आणि आम्हाला लवकरात लवकर न्याय द्या एवढीच अपेक्षा आहे असे वैभवीने पुढे म्हटलं आहे.

## 'युपीएससी' परीक्षेच्या मुलाखतीसाठी मोफत प्रशिक्षण

दैनिक आपला विदर्भ

■ उदय नरे

**मुंबई :** 'युपीएससी' तर्फे घेतल्या गेलेल्या नागरी सेवा मुख्य परीक्षा २०२४ या परीक्षेचे निकाल घोषित झाले आहेत. मुख्य परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या राज्यातील विद्यार्थ्यांसाठी राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था (SIAC) मुंबई येथे मुलाखत प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आल्याची माहिती, राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्थेच्या संचालक डॉ.भावना पाटोळे यांनी कळविले आहे.

या प्रशिक्षणाचा लाभ घेण्यासाठी राज्यातील विद्यार्थ्यांनी दि. २ जानेवारी २०२५ पूर्वी siac1915gmail.com या ई-मेलवर अर्ज करावेत. मुलाखत प्रशिक्षण नोंदणीसाठी www.siac.org.in या संकेतस्थळावरील सूचनांचे अवलोकन करावे. अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक ०२२-२२०७०९४२ येथे संपर्क साधावा असे संचालक, राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई यांनी कळविले आहे.

## भारत मुक्ती मोर्चा व राष्ट्रीय पिछडा ओबीसी वर्ग मोर्चाच्या वतीने भारत बंद संदर्भात डोणगांव येथे आंदोलन संपन्न




दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** दि.३१डिंसेबरला ओबीसी जातीनिहाय जनगणना, इव्हिएम मशीन हटाव,तसेच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या विरोधात भारत बंदचे आंदोलन भारत मुक्ती मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष माननीय वामन मेश्राम यांनी पुकारले होते त्यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण भारतभर बंद चे नियोजन करण्यात आले होते याच मुद्यावर डोणगांव येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले यावेळी भारत मुक्ती मोर्चा, राष्ट्रीय पिछडा ओबीसी वर्ग मोर्चा, राष्ट्रीय मुस्लिम मोर्चा, राष्ट्रीय आदिवासी एकता परिषद यांच्या कार्यकर्त्यांनी भागवत जाधव यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन केले.. यावेळी त्यांच्या सोबत मुरलीधर लांभाडे,एल.आर.खोडके,व्हि. के.नेमाडे, कैलास पवार,बाळु वाघमारे,हरीदास मिरासे, शिवाजी डाखोरे, युसुफ खान,अहेमद बागवान,सरबेज शहा,प्रदिप बोरकर, रामचंद्र जाधव,अफरोज शहा, वसंतराव अवचार,अमजद खान,जावेद शहा,सह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते...

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील शहीदांच्या स्मारकाचे काम सुरु करा; आंबेडकरी कार्यकर्त्यांची मागणी




दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजी नगर/प्रतिनिधी :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराचा इतिहास सामाजिक संघर्ष, राजकीय चळवळ आणि सामाजिक न्यायासाठीच्या लढ्याचा महत्वपूर्ण भाग आहे. हा लढा १६ वर्ष चालला. या लढ्यात अनेकांनी आपल्या जीवाची आहूती दिली नंतर विद्यापीठाचा नामविस्तार झाला. याच लढ्यात हुतात्मा झालेल्यांचं एक स्मारक विद्यापीठाच्या प्रवेशद्वाराजवळ होत आहे. मात्र ज्या जागेवर हे स्मारक उभा केलं जातंय ती जागा वक्फ बोर्डाची असल्याचा दावा करण्यात आला आहे आणि हे बांधकाम थांबवण्यात आले आहे. वक्फ बोर्डाने केलेला दावा खोटा आहे, स्मारकाचे काम लवकरात लवकर सुरु करावे अशी मागणी रिपब्लिकन युवा सेना आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराच्या लढ्यात सहभागी असणारे रमेश खंडागळे यांनी केली आहे.

## ग्रामीण भागात घरकुल योजनेला बळकटी देणार – ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे

**मुंबई /प्रतिनिधी :** येणाऱ्या काळात ग्रामीण भागातील मूलभूत सोयी-सुविधा अधिक बळकट करण्यावर भर देण्यात येणार असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार गरिबांना घरकुल मिळण्यासाठी, या योजनेला अधिक बळकटी देण्यासाठी १०० दिवसांत २० लाख घरकुलांना मान्यता देण्याचा संकल्प असल्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितले.

## सावधान! जगाची चिंता वाढली, नवीन वर्ष २०२५ ठरणार सर्वात उष्ण? डब्ल्युएमओ वर्तवला अंदाज

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई /प्रतिनिधी :** जगभरातील वातावरणात सातत्यानं बदल होत आहे. बदलत्या हवामानाचा मोठा फटका जगातील अनेक देशांना बसत आहे. २०२४ वर्षाचा आजचा शेवटचा दिवस आहे. हे वर्ष जसे उष्ण राहिले, तसेच २०२५ हे नवीन वर्ष देखील सर्वात जास्त उष्ण ठरण्याची शक्यता आहे. जागतिक हवामान संघटनेने याबाबतचा इशारा दिला आहे.

पुढील वर्षी देखील या वर्षीसारखेच विक्रमी तापमान दिसून येईल असा अंदाज डब्ल्युएमओ ने व्यक्त केला आहे. त्यामुळं हरितगृह वायूंची पातळी आणखी वाढू शकते. ज्यामुळे भविष्यात आपल्याला अधिक उष्णतेचा सामना करावा लागू शकतो. डब्ल्युएमओ च्या मते, २०२४ नंतर २०२५ हे सर्वात उष्ण वर्षापैकी एक असू शकते. त्याचा परिणाम जगभर दिसून येईल. युनायटेड नेशन्सचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस म्हणाले की, गेले एक दशक झाले आपण प्राणघातक उष्णतेतून जात आहोत. जे देश शांत आणि निरोगी भविष्यासाठी काम करत आहेत त्यांच्या पाठीशी आम्ही उभे असल्याचे ते म्हणाले. डब्ल्युएमओ चा संदर्भ देत गुटेरेस म्हणाले की, २०१५ ते २०२४ पर्यतच्या हवामान बदलाने स्पष्ट संकेत दिले आहेत.

दरम्यान, या हवामान बदलाच्या स्थितीतून आपण बाहेर पडलो नाही, तर भविष्यातील परिस्थिती आणखी गंभीर होऊ शकते, असा इशारा गुटेरेस यांनी दिला. त्यांच्या मते, २०२५ मध्ये अनेक देशांना उत्सर्जन कमी करावे लागेल आणि सुरक्षित मार्गाचा अवलंब करावा लागेल. ऊर्जा संकटाचा सामना करण्यासाठी आणि हवामान बदलाचे परिणाम कमी करण्यासाठी काम करावं लागेल. स्वच्छ आणि शाश्वत उर्जा स्त्रोतांकडे आपण वाटचाल करायला हवी असेही टोनियो गुटेरेस म्हणाले.

हवामान बदलाच्या संकटावर काम करणं ही एका देशाची जबाबदारी नसून ती जागतिक जबाबदारी आहे. हवामान संकटाचा सामना करण्यासाठी प्रत्येक व्यक्ती आणि प्रत्येक देशाला एकजुटीने काम करावे लागेल. आपल्या भावी पिढ्यांसाठी सुरक्षित आणि निरोगी वातावरण निर्माण करणे हे आपल्या पिढीचे कर्तव्य असल्याची माहिती तज्ज्ञांनी दिली आहे.

दरम्यान, सध्या हवामान बदलाचा मोठा फटका जगभरातील अनेक देशांना बसत आहे. याचा आरोग्यावर देखील विपरीत परिणाम होत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. दरम्यान, हवामान बदलाचा शेती क्षेत्राला देखील मोठी फटका बसत असल्याचे पाहायला मिळत आहे.

## वाल्मिक कराड ३ दिवस पुण्यातच होता, सोबत आलेल्या नगरसेवकांनी मार्गच सांगितला!

**बीड/प्रतिनिधी :** बीड येथील मस्साजोग गावचे माजी सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबरला खून करण्यात आला. या हत्या प्रकरणात मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय असलेले वाल्मिक कराड यांच्यावर आरोप केला जात आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर वाल्मिक कराड फरार होता. मात्र आज २२ दिवसांनंतर वाल्मिक कराड हा पुण्यातील सीआयडीच्या कार्यालयात शरण आला. तर वाल्मिक कराडसोबत आलेल्या त्यांच्या कार्यकर्त्यांनी आता धक्कादायक खुलासा केला आहे. वाल्मिक कराड ३ दिवस पुण्यातच होता, असे त्यांनी म्हटले आहे. यामुळे पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत.

संतोष देशमुख यांचे हत्याप्रकरण सध्या राज्यभरात चर्चेत आले आहे. या प्रकरणाचा मास्तरमाइंड वाल्मिक कराड असल्याचा आरोप विरोधकांनी केला. त्यानंतर वाल्मिक कराड तब्बल २२ दिवस फरार होता. मात्र, आज त्याने पुण्यातील सीआयडीच्या कार्यालयात येत आत्मसमर्पण केले. सीआयडी कार्यालयात येण्यापूर्वी त्याने एक व्हिडिओ जारी करत आली भूमिका मांडली. केज पोलीस स्टेशनमध्ये खोटी खंडणीची फिर्याद दाखल झाली आहे. मला अटकपूर्व अधिकार असताना मी सीआयडी ऑफिस, पुणे पाषाण येथे सरेंडर होत आहे. संतोष देशमुख यांचे जे कोणी मारेकरी असतील, त्यांना अटक करावी आणि फाशीची शिक्षा द्यावी. राजकीय रोषाने माझं नाव त्यांच्याशी जोडले जात आहे.

## प्रगतीशील महाराष्ट्र, गतीशील महाराष्ट्राच्या निर्धारासाठी एकजूट करुया- मुख्यमंत्री फडणवीस

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** नवा महाराष्ट्र घडवायचा आहे. प्रगतीशील महाराष्ट्राला आणखी गतीशील बनवायचे आहे. त्यासाठी आपण सर्वांनी ..महाराष्ट्र आता थांबणार नाही...अशी प्रतिज्ञा करूया, एकजूट करुया असा निर्धार व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील नागरिकांना नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

हा निर्धार पूर्ण करण्यासाठी राज्यातील कष्टकरी, शेतकरी, कामगारासह सर्वांचीच साथ लाभेल, असा विश्वास देखील मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी नववर्षाच्या पूर्वसंध्येला दिलेल्या शुभेच्छा संदेशात नमूद केला आहे.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणतात, 'येणारे वर्ष सुख, समाधान आणि समृद्धी घेऊन येवो. महाराष्ट्राच्या प्रगतीची पताका अखंडीत फडकत ठेवण्याची ऊर्जा आणि उर्मी मिळत राहो, हीच मनोकामना. छत्रपती शिवाजी महाराज आणि अनेक थोर संतांच्या आशीर्वादाच्या छत्रछायेखालील महाराष्ट्राला आधुनिकीकरणाच्या या युगात जगातील सर्वोत्तम राज्य म्हणून अग्रेसर ठेवायचे आहे. आपल्या कष्टकरी, शेतकरी, कामगारांच्या राबणाऱ्या आणि कला-क्रीडा-साहित्य-संस्कृती क्षेत्रातील सर्जक हातांनी या राज्याच्या वैभवात भरच घातली आहे. हा लौकिक आपल्याला वाढवायचा आहे. शेती-माती व सिंचन, शिक्षण, आरोग्य, उद्योग- ऊर्जा, माहिती तंत्रज्ञान ते नवनव्या औद्योगिक क्रांती यांना पादाक्रांत करायचे आहे. यासाठी राज्यातील शांतता-सलोखा, परस्पर स्नेह, आदरभाव वृद्धिंगत होईल. पर्यावरण आणि जल-जंगल-जमीन यांचं जतन-संवर्धन होईल, असे प्रयत्न करायचे आहेत. हा संकल्प घेऊन वाटचाल करायची आहे, त्यासाठी नववर्ष चैतन्यदायी ठरेल. सकारात्मक ऊर्जेने भारलेल्या नवसंकल्पना घेऊन येईल. यातून आपला महाराष्ट्र आता थांबणार नाही, हा यत्न पूर्णत्वास जाईल. अशी मनोकामना करतो. तशी ईश्वरचरणी प्रार्थना करतो, असे नमूद करून मुख्यमंत्री श्री फडणवीस यांनी शुभेच्छा देऊन सगळ्यांचे नववर्षाभिनंदन केले आहे.



CMYK

# होर्डिंग्ज लावणार असाल तर सावधान,मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अवमानाचा दाखल होऊ शकतो गुन्हा

## अनधिकृत होर्डींगवर सक्त कारवाईचे आयुक्तांचे निर्देश राजकीय पक्ष व प्रिंटर्सना केले अवगत

दैनिक आपला विदर्भ

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** चंद्रपूर महानगरपालिका हद्दीतील विना परवानगी होर्डिंग,बॅनर,जाहीरात फलक उभारणाऱ्यांवर सक्त कारवाई करण्याचे निर्देश आयुक्त विपीन पालीवाल यांनी दिले असुन अनधिकृत होर्डींगसाठी मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाबाबत राजकीय पक्ष प्रतिनिधी व बॅनर छापणाऱ्या प्रिंटर्सना सोमवार ३१ डिसेंबर रोजी झालेल्या बैठकीत मनपा प्रशासनाद्वारे अवगत करण्यात आले.

घाटकोपर येथील होर्डींग दुर्घटनेनंतर सुस्वराज फाऊंडेशनची दाखल जनहित याचिका क्र.१५५ / २०११ नुसार मा.उच्च न्यायालयाने शहरातील अनधिकृत होर्डींग,बॅनर, जाहीरात फलकांवर सक्त कारवाई निर्देश दिलेले आहेत.त्याअनुषंगाने पोलीस विभाग व मनपा प्रशासनाद्वारे मनपा क्षेत्रातील प्रिंटर्स व राजकीय पक्ष प्रतिनिधींची बैठक घेण्यात आली. यात आयुक्त यांनी संबंधितांना मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाबाबत अवगत केले व शहरात कुठलेही अवैध बॅनर,जाहीरात फलक,होर्डिंग लाऊ नये अन्यथा न्यायालयीन आदेशानुसार कारवाई करण्यात येणार असल्याची कल्पना दिली.



अनधिकृत होर्डिंग्ज, बॅनर, फलक पालिका करणार जप्त असून गुन्हाही दाखल केला जाणार आहे. अनधिकृत होर्डिंग्ज तपासणीसाठी क्यूआर कोड देण्यात आला आहे. तो क्यूआर कोड नसेल तर कारवाई होणार आहे.

त्याचप्रमाणे त्याचप्रमाणे नागरिकांच्या सहभागासाठी वॉर्ड निहाय समिती सुद्धा स्थापन केली जाणार असुन तक्रार करण्यास वेबसाईट तसेच संपर्क क्रमांक मनपातर्फे उपलब्ध करून देण्यात आला आहे. अनधिकृत बॅनर,पोस्टर्स होर्डींग वर निष्कासनाची कारवाई करण्यासाठी स्थानिक पोलीस प्रश्र्न यांनी पुरेसे संरक्षण उपलब्ध करून देण्याचे तसेच आवश्यकता असल्यास हत्यारबंद पोलीस देखील पुरविण्याचे न्यायालयाने आदेशित केले आहे

याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील,उपायुक्त मंगेश खवले,रामनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक आसिफ राजा,सिटी पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षक प्रभावती एकुरके,दुर्गापूर पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षक लता वाढीवे,सहायक आयुक्त शुभांगी सूर्यवंशी,संतोष गर्गे लवार,अनिलकुमार घुले तसेच राजकीय पक्षांचे व प्रिंटिंग प्रेसचे प्रतिनिधी उपस्थीत होते.

## मुंबईला प्रदूषणाचा विळखा

महाराष्ट्राची राजधानी असलेली मुंबई आता प्रदूषणाचीही राजधानी बनू लागली आहे. मुंबईतील प्रदूषणाने धोक्याची पातळी ओलांडली आहे. मागील काही दिवसात मुंबईतील हवेचा दर्जा अतिशय खराब नोंदवला गेला त्यामुळे दिल्ली पाठोपाठ आता मुंबईही सर्वाधिक प्रदूषित शहर बनले आहे. अर्थात ही काय भूषणावह बाब नाही उलट यामुळे महाराष्ट्राची मान खाली झुकली आहे अर्थात त्यात आश्र्चर्य वाटण्यासारखे काही नाही मुंबईतील प्रदूषणावर नियंत्रण आणण्यासाठी ठोस उपाय करा असा अनेक सामाजिक व सेवाभावी संघटनेने सरकारला इशारा दिला होता मात्र सरकारने त्याकडे दुर्लक्ष केले. केवळ मुंबईचं नाही तर मुंबईसह राज्यातील काही शहरांच्या हवेचा दर्जा देखील खराब श्रेणीत नोंदवला गेला आहे. गेल्या काही दिवसासून मुंबई शहरावर धुळीची चादर पसरली आहे. पश्र्चिम आशियातून येणाऱ्या धुळीच्या वादळाचा हा परिणाम असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. मात्र मुंबईतील प्रदूषणाचे केवळ हेच एकमेव कारण आहे असे नाही. मुंबईतील वाढत्या प्रदूषणाला इतर अनेक घटकही कारणीभूत आहेत. वाढत्या प्रदूषणामुळे मुंबई करांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे त्यामुळे मुंबई करांची चिंता वाढली आहे. मागील वर्षी स्विस संस्था आयक्युएअरने जागतिक प्रदूषणावर एक अहवाल प्रसिद्ध केला होता. या अहवालात जगातील सर्वाधिक प्रदूषित शहरांची यादी प्रसिद्ध करण्यात आली होती. या यादीत भारतातील दिल्ली, मुंबई, कोलकाता, हैदराबाद, चेन्नई यासारख्या मोठ्या आणि महत्वाच्या शहरांचा समावेश होता. या शहरात वातावरणातील प्रदूषणकारी घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएम – २.५ कणांचे प्रमाण ५३.३ मायक्रोग्राम क्यूबिक मीटर या पातळीवर आले असून ते आरोग्य संघटनेने निर्धारित केलेल्या सुरक्षेच्या पातळीपेक्षा दहापटीने अधिक असल्याचे या अहवालात नमूद करण्यात आले होते.आज देशातील सर्वच महत्वाची शहरे प्रदूषणाने गुदमरत आहेत. त्या शहरात राहणाऱ्या नागरिकांचे जीवन प्रदूषणामुळे धोक्यात आले आहे. एकीकडे २१ व्या शतकातील सुखासीन जीवनाचे मनोहरी चित्र उभे केले जात आहे. स्मार्ट सिटीचे स्वप्न दाखवले जात आहे तर दुसरीकडे याच शहरांची फुफ्फुसे प्रदूषणाने निकामी होत आहेत. प्रदूषणामुळे या शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. प्रदूषणामुळे या शहरातील नागरिकांना फुफ्फुसाचे, हृदयाचे, रक्ताभिसरणाचे आजार मोठ्या प्रमाणावर होत आहेत. न्यूमोनिया, पक्षघात, हृदयविकार, फुफ्फुसाचा कर्करोग यासारखे मोठे आजार प्रदूषित हवेमुळेच होत आहेत. प्रदूषणामुळे दिल्लीसारख्या देशाच्या राजधानीची किती वाईट अवस्था झाली आहे हे आपण पाहत आहोतच. प्रदूषणामुळे दिल्लीतील शाळा कॉलेजसना सुट्टी देण्याची वेळ प्रशासनावर येते. चार वर्षांपूर्वी दिल्लीत इंग्लंड आणि भारत यांच्यात झालेल्या कसोटी सामन्यात खेळाडू चक्क मास्क लावून मैदानात उतरले होते. नंतर हा सामना देखील प्रदूषणामुळे रद्द करावा लागला होता त्यामुळे भारताची जगात नाचक्की झाली होती. जे दिल्लीत आहे तेच मुंबईत आहे. देशाची आर्थिक राजधानी असलेली मुंबई प्रदूषणाच्या बाबतीत आता देशाच्या राजधानीची बरोबरी करू लागली आहे. मुंबईचे प्रदूषणही उच्चतम पातळीवर पोहचले आहे.प्रदूषणामुळे लोकांना शुद्ध हवा मिळणे दुरापास्त झाले आहे. शुद्ध हवेसाठी लोकांना पैसे मोजावे लागत आहे. मुंबई – दिल्लीसारख्या मोठ्या लोकसंख्येच्या शहरात ऑक्सिजन बार सुरू करण्यात आले आहेत. एका तासाला २०० ते ५०० रुपये मोजून नागरिक ऑक्सिजन विकत घेत आहेत. इतके होऊनही आपण त्यातून बोध घेत नाही. या मोठ्या शहरात वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. मुंबई, पुणे, नागपूर यासारख्या मोठ्या शहरात लोकसंख्येपेक्षा वाहनांची संख्या अधिक आहे. वाढत्या वाहनांमुळे प्रदूषणात भर पडत आहे. वाहनातून बाहेर पडणाऱ्या धुरात प्रदूषणाचे प्रमाण खूप असते. धूळ, कारखान्यातून निघणारा धूर, बांधकामातून पसरणारे कण, वृक्षतोड, पृथ्वीचे वाढते तापमान, प्लास्टिकचा भस्मासुर अशा अनेक कारणांमुळे प्रदूषणाचा आलेख उंचावत आहे. वाढते प्रदूषण कमी करण्यासाठी वेळीच ठोस उपाय करायला हवेत. कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या धुरातून प्रदूषणकारी घटक कमी करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करायला हवा. दगड खाणींवर नियंत्रण आणायला हवे. वाहनांची संख्याही कमी करायला हवी. प्रसंगी सम – विषम सारखे कठोर निर्णय घ्यायला हवेत. बांधकामांवर नियंत्रण आणायला हवे. युरोपीय देशात प्रदूषण कमी करण्यासाठी काय उपाययोजना केल्या जातात याचा अभ्यास करायला हवा. नागरिकांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अधिकाधिक वापर केला पाहिजे. याशिवाय कचऱ्याचे योग्य वर्गीकरण आणि विल्हेवाट तसेच सौरऊर्जेच्या वापरावर भर द्यायला हवा. वृक्षारोपण करुन ते वृक्ष जगवले पाहिजेत. शासन, प्रशासन आणि नागरिकांच्या एकत्रित प्रयत्नांतूनच प्रदूषणाचा हा भस्मासुर रोखता येईल.

## १४ दिवस कोमात होता अभिनेत्याचा मुलगा, बाहेर येताच आई–वडील नाही घेतलं थलपति विजयचं नाव

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** प्रसिद्ध साऊथ अभिनेता थलापति विजय याने काही महिन्यांआधीच इंडस्ट्रीतून निवृत्ती घेतली. त्यानंतर त्याने स्वत: राजकीय पक्ष स्थापन केला. सध्या तो राजकारणात काम करतोय. अशातच अभिनेत्याच्या वैयक्तिक आयुष्यासंबंधी एक मोठी माहिती समोर आली आहे. प्रसिद्ध अभिनेत्याचा मुलगा मागील १५ दिवसांपासून खउणमध्ये उपचार घेत होता. १५ दिवसांनी तो खउणमधून बाहेर आला. बाहेर येताच त्याने आई वडिलांचं नाही तर थलापति विजयचं नाव घेतलं. अभिनेत्याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे ज्यात त्याने हा खुलासा केला आहे.

थलपति विजयने आता आपल्या फिल्मी करिअरला अलविदा केलं आणि आपला सगळा वेळ राजकारणात दिला आहे. परंतु त्याच्या दोन चित्रपटांचं शूटिंग अद्याप सुरू आहे. सोशल मीडियावर एक व्हिडिओ व्हायरल होत आहे, ज्यामध्ये एक प्रसिद्ध अभिनेता त्याच्या मुलाशी संबंधित एक घटना सांगत आहे.

व्हायरल होत असलेल्या या व्हिडिओमध्ये, अभिनेता नस्सरने त्याच्या आणि विजय थलपथीच्या बाँडबद्दल भाष्य केलंय.अभिनेत्याने सांगितले की त्यांचा मुलगा थलपथीचा मोठा चाहता आहे. काही काळापूर्वी त्यांचा मुलगा नूरुल हसन फैजल १४ दिवसांपासून कोमात होता. मुलावर सिंगापूरमध्ये उपचार सुरू आहेत. १४ दिवस उपचार सुरू असताना तो कोमात होता. पण शुद्धीवर येताच त्याने ना आई म्हणाली ना वडिलांना फक्त विजय थलपथीचे नाव घेतले.

## १७५ रक्तदात्यांनी रक्तदान करत केला थर्टी फस्ट साजरा

**पंढरपूर /प्रतिनिधी :** सरत्या वर्षाला निरोप आणि नववर्षाचे स्वागत पंढरपुरात विधायक पद्धतीने करण्यात आले. तब्बल १७५ रक्तदात्यांनी रक्तदान करून थर्टी फर्स्ट साजरा करत नवीन वर्षाचे स्वागत केले. श्यराम गोगाव आणि आदित्य फत्तेपुरकर मित्रपरिवाराच्या वतीने गेल्या २० वर्षापासून रक्तदानाची चळवळ थर्टी फर्स्ट रोजी चालवली जाते. श्याराम गोगाव आणि माजी नगरसेवक आदित्य फत्तेपूरकर यांच्या एन आय टी मित्र परिवाराच्या वतीने प्रतिवर्षी थर्टी फर्स्ट रोजी रक्तदान शिबिर आयोजित केले जाते. यंदाच्याही वर्षी थर्टी फर्स्ट रोजी सकाळी नऊ वाजले पासून रक्तदात्यांनी रक्तदान करण्यासाठी गर्दी केली. तब्बल १७५ रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. यावेळी रक्तदात्यांना प्रमाणपत्रासह भेट देण्यात आली. रक्तदान केल्यानंतर वैद्यकीय सल्ल्यानुसार पुढील ४८ तास कुठल्याही प्रकारचे व्यसन अथवा मद्य घेता येत नाही. त्यामुळे थर्टी फर्स्ट रोजी पार्टी , डीजे , अशा गोष्टींना फाटा देत विधायक पद्धतीने व्यसनमुक्त पिढी घडवण्याचा संकल्प श्याम गोगाव आणि आदित्य फत्तेपूरकर मित्र परिवाराच्या वतीने करण्यात येत आहे. विशेष म्हणजे सलग गेल्या २० वर्षापासून थर्टी फर्स्ट रोजी रक्तदानाची ही चळवळ अव्याहातपणे सुरू आहे.







## जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयामध्ये ‘वाचन संकल्प महाराष्ट्राचा’ उपक्रम

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** अलिकडच्या काळात देशाची तरूण पिढी वाचन संस्कृतीपासुन दुरावत असल्याचे दिसत आहे. या पिढीला प्रत्यक्ष ग्रंथ वाचनाकडे आकर्षित करण्यासाठी दि. १ ते १५ जानेवारी या कालावधीत ‘वाचन संकल्प महाराष्ट्राचा’ उपक्रम राबविण्यात येणार आहे. त्यानिमित्त जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाच्यावतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

हा उपक्रम विद्यापिठे, महाविद्यालये, सार्वजनिक ग्रंथालय तसेच शासकीय ग्रंथालय यांच्या माध्यमातून दि.१ ते १५ जानेवारी दरम्यान राबविला जाणार आहे. या अभिनव उपक्रमांतर्गत जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय बुलढाणा येथे ग्रंथप्रदर्शन, सामुहिक वाचन, वाचन कौशल्य कार्यशाळा, वाचन संवाद, पुस्तक परीक्षण व कथन अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. बुलढाणा जिल्ह्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांमध्येही वाचन पंधरवडा राबविण्यात येणार आहे.

जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, बुलढाणा येथील ग्रंथालयामध्ये आजमितीस सुमारे १ लक्ष ६० हजार ग्रंथसंपदा उपलब्ध असून त्यामध्ये मराठी, इंग्रजी व हिंदी भाषेतील विविधांगी कथासंग्रह, कादंबरी, संदर्भग्रंथ, ललित वाङ:मय, स्पर्धा परीक्षा ग्रंथ इत्यादी ग्रंथसंपदा उपलब्ध असून वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमामध्ये जास्तीतजास्त वाचकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुनिल पाटील यांनी केले आहे.




DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# जिल्ह्यात रब्बी पेरणीचा २ लाख ९८ हजार ९२४ शेतकऱ्यांनी काढला एक रुपयात पिक विमा

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजी नगर/प्रतिनिधी :** छत्रपती संभाजी नगर रब्बी हंगामासाठी पंतप्रधान पिक विमा योजनेसाठी अर्ज करण्याची मुदत १५ डिसेंबर होती एक रुपयात पीक विमा उपलब्ध करण्यात आला आहे. गतवर्षीपेक्षा पिक पेरा ही वाढला आहे, परिणामी गतवर्षीच्या तुलनेत यंदा पिक विमा काढणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या वाढल्याचे दिसत आहे. एक रुपया मध्ये पिक विमा काढणारे यावेळेस जास्त आहेत. गेल्या सरकारच्या काळात कृषी मंत्रालयाने एक रुपयात विमा देण्याची घोषणा केली होती गतवर्षी पासून या योजनेची अंमलबजावणी सुरू झाली आहे. एक रुपयात पिक विमा योजना लागू झाल्यापासून पिक विमा काढणाऱ्या अर्जदारांची ही संख्या वाढली आहे. रब्बी हंगामातील ज्वारी पिकासाठी ३० नोव्हेंबर ही शेवटची तारीख होती तर हरभरा गहू आणि रब्बी कांदा पिकांचा विमा काढण्यासाठी १५ डिसेंबर ही अंतिम तारीख होती.

शेवटच्या तारखेपर्यंत जिल्ह्यात २ लाख ९८ हजार ९२४ पीक विम्याचे अर्ज विमा कंपनीकडे दाखल झाले आहेत. यंदा पिक विम्याच्या अर्जाची संख्या ५०००० ने वाढली आहे. गतवर्षी जिल्ह्यात २ लाख ४० हजार ८५६ पिक विमा अर्ज विमा कंपनीकडे दाखल झाले होते. खरीप हंगामात चांगला पाऊस पडला होता यामुळे नदी नाल्यांना पूर आल्याने भूजल पातळीत वाढ झाली आहे परिणामी गतवर्षीच्या तुलनेत रब्बीचे पिकाचे क्षेत्रही वाढले असून शेतकरी सरकी उपटून तिथे गहू पेरत आहे यामुळे पीक विम्याच्या अर्जाची संख्या सुमारे ५० हजारांनी वाढले असल्याची माहिती जिल्हा कृषी अधीक्षक प्रकाश देशमुख यांनी दिली आहे.









**ठाणे/प्रतिनिधी :** नवीन वर्षाच्या स्वागतार्थ आयोजित मध्यरात्रीच्या रक्तदान शिबिराला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची उपस्थिती

## मुंब्रा पोलीस स्टेशनच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाकडून गुंगीकारक औषधी बॉटल्सच्या साठ्यासह एका इसमाला अटक

दैनिक आपला विदर्भ



**ठाणे/प्रतिनिधी :** मुंब्रा पोलीस स्टेशन, अंमली पदार्थ विरोधी पथकातील पोलीस अधिकाऱ्यांनी थर्टी फस्टच्या अनुषंगाने कारवाई करण्यास सुरुवात केली आहे.

मुंब्रा पोलीस ठाणे हद्दीत अंमली पदार्थ विरोधी गस्त करत असताना पोलीस हवालदार कलगोंडा बन्ने यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार काल पहाटे ०३:०० वाजत सुमारास मुंब्रादेवी मंदिर पायथ्यालगत बोगद्याजवळ सापळा रचत कारवाई करत प्रतिबंधीत औषधींचा साठा जप्त केला आहे. मानवी शरीरावर अपाय करणाऱ्या एकूण २४० कोडीनयुक्त प्रतिबंधीत औषधी बॉटलचा (कोरेक्स) साठा हस्तगत करण्यात आला आहे. यामध्ये मुंब्रा पोलीस स्टेशन गु.रजि.क. २५५०/२०२४ एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८ (क), २२ (क) सह औषधे व सौंदर्य प्रसाधने अधिनियम १९४० चे कलम १८, (क), १८ (अ) २७ (बी), २८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस उप निरीक्षक विजय सानप हे करत असुन ठाणे पोलीस आयुक्तालय परिसरात मादक पदार्थाचे रॅकेट चालवणारी मोठी टोळी असण्याची शक्यता असल्याने त्या दृष्टीने तपास करण्याच्या सुचना गुन्हयाचे तपासिक अधिकारी यांना देण्यात आल्या आहेत.

## चोपडा शहर व तालुक्यात नोव्हेंबर व डिसेंबर महिन्यात ५२७ जणांना भटक्या कुत्र्यांचा चावा, नगरपालिका प्रशासन सुस्त

**जळगाव/प्रतिनिधी :** चोपडा शहर व तालुक्यात मोठ्या प्रमाणावर गेल्या काही महिन्यांपासून भटक्या कुत्र्यांचा वावर वाढला आहे. त्यामध्ये काही कुत्रे जखमी तर काही व्याधीने ग्रस्त असे देखील आढळून येत आहे. या भटक्या कुत्र्यांचा नागरिकांना व बालकांना चावा घेण्याच्या प्रकार वाढलेला दिसत आहे. चोपडा शहर व तालुक्यात कुत्र्याचा चावा घेतलेले रुग्ण दररोज उपचार घेण्यासाठी दहा ते पंधरा येत असतात गेल्या दोन महिन्यात कुत्र्यांनी चावा घेतलेला नागरिकांची संख्या ५२७ आहे. फक्त डिसेंबर महिन्याचा विचार केला तर ३० डिसेंबर पर्यंत ३११ जणांना चावा घेतल्याची नोंद उपजिल्हा रुग्णालयात आहे. सदर कुत्र्यांचा चावा घेतलेल्या नागरिकांना उपजिल्हा रुग्णालयामध्ये योग्य तो उपचार देण्यात येत असल्याचे उपजिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक डॉक्टर सुरेश पाटील यांनी सांगितले.

## वाकद शिवारात बिबट्याची दहशत, वाकद शिवारातील ग्रामस्थावर केला हल्ला



दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** निफाड तालुक्यातील लासलगाव – शिर्डी रस्त्यावरील वाकद परिसरात बिबट्याने एका शेतकऱ्यावर हल्ला चढविला. परिसरातील शेतकऱ्याने आरडा ओरड केल्यानंतर तेथून बिबट्याने धूम ठोकली. दरम्यान, मागील पंधरवड्यापासून या भागात बिबट्याचे दर्शन होत असून यापूर्वीही काही प्राणी या बिबट्याने भक्ष केले आहे. आता मानवी वस्तीकडे या बिबट्याची नजर असून माणसांवरही हा बिबट्या हल्ला करत आहे. सद्या परिसरात कांदा लागवड सुरू असून शेताला पाणी देण्यासाठी रात्रीं पहाटे केव्हाही जावे लागत असल्याने शेतकरी भीतीच्या वातावरणात आहे. वनविभागाने त्वरित पिंजरा लावून बिबट्याला पकडावे अशी मागणी स्थानिक शेतकऱ्यांकडून केली जात आहे.




महत्त्वाचे...

### नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील उपायुक्त व उपायुक्त समकक्ष पदावर पदोन्नती मिळालेल्या अधिकार्यांचा सन्मान




दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका आस्थापनेवर उपायुक्त या पदावर संजय जाधव व अजितपाल सिंग संधु यांना पदोन्नती देण्यात आली तसेच उपायुक्त समकक्ष पदावर गुलाम सादिक यांची मालमत्ता विनियोग अधिकारी, डॉ. मिर्झा बेग मुख्य उद्यान अधिक्षक, रमेश चवरे क्रिडा व सांस्कृतिक अधिकारी म्हणून यांना पदोन्नती देण्यात आली. या पदोन्नती निमित्त नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका कामगार कर्मचारी युनियनच्या सन्मान करण्यात आला. यावेळी अध्यक्ष म्हणून नांदेड वाघाळा महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. मेहशकुमार डोईफोडे होते तर प्रमुख उपस्थितीत एच व्ही आरगुंडे उपसचिव मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय मुबंई, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम हे उपस्थित होते.

### नववर्षाच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई वाहतूक पोलीस ॲक्शन मोडवर





दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** नवं वर्षाचं स्वागत करत असतानाच वाहतुकीच्या नियमांचे देखील कडेकोट पालन व्हावं यासाठी नवी मुंबई पोलीस सज्ज झाले आहे. नवी मुंबई शहरातील सर्व प्रमुख चौकात नाकाबंदी करण्यात आली असून वाहन धारकांची ब्रेथ एनालायझर मशीन द्वारे चाचणी करण्यात येते आहे. या चाचणीत यशस्वी झाल्यास चॉकलेट मात्र चाचणी पॉझिटीव्ह आल्यास थेट दांडात्मक कारवाई करण्यात येत आहे. यासोबतच शहरातील बार पब तसेच ग्रामीण भागात असणाऱ्या फार्महाऊस वर अंमली पदार्थाचे सेवन केले जाऊ शकते यासर्व ठिकाणी अमली पदार्थ विरोधी पथकाचे लक्ष राहणार आहे. शहरात साडे तीन हजार पोलीस अधिकारी आणि कर्मचारी आज रस्त्यावर सुरक्षा व्यवस्थेसाठी तैनात राहणार असून सीसीटीव्ही द्वारे देखील सर्व ठिकाणी करडी नजर ठेवली जाणार आहे. खुद्द पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे देखील ॲक्शन मोड वर पहायला मिळत आहेत.

### नवी मुंबईत २०२३ च्या तुलनेत २०२४ मध्ये सायबर गुन्हेगारीत वाढ, फसवणूकीची रक्कम चौपट वाढली



दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** नवी मुंबई शहरात यावर्षी सायबर गुन्हेगारीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. यावर्षी साधारण १२,३०० नागरिकांना गंडा घालत सायबर चोरट्यांनी तब्बल २७० कोटी रुपयांची आर्थिक फसवणूक केली आहे. तर २०२३ मध्ये ७००० नागरिकांची सायबर चोरट्यांनी ६७ कोटी रुपयांची फसवणूक केली होती. यामध्ये सर्वाधिक प्रकरणं ही शेअरमार्केट मध्ये गुंतवणूक केल्यास अधिक नफा देण्याचे आमिष दाखवून फसवणूक केल्याचे दिसून येतात. यावर्षी ४० ते ५० सायबर चोरट्यांना अटक करण्यात पोलीसांना यश आले असून सायबर गुन्हेगारी विरोधात जनजागृती करण्याचे सर्वोतोपारी प्रयत्न करण्यात येत असल्याची माहिती सायबर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन कदम यांनी दिली आहे.

### प्रहार जनशक्ती पक्षाचा जिल्हा परिषदेवर हंडा मोर्चा

**छत्रपती संभाजी नगर/प्रतिनिधी :** छत्रपती संभाजी नगर मध्ये जलजीवन मिशन अंतर्गत नाथनगर, हनुमान नगर आणि वडखा या गावांमध्ये शासनाने पिण्याच्या पाण्यासाठी शेंद्रा एमआयडीसी मधून पाईपलाईनचे काम ठेकेदाराला दिले परंतु, त्या ठेकेदाराने ६० लाख रुपये घेऊन सुद्धा कामाला सुरुवात केली नाही. कामाला कोणतीही गती मिळालेली नाही, अनेक वेळा निवेदन देऊन देखील काम सुरू होत नाही याच्या निषेधार्थ आज प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने जिल्हा परिषदेवर हंडा मोर्चा काढण्यात आला.

## विविध वृत्त...

### नवीन वर्षाचे स्वागत करताना कुणीही कायदा हातात घेऊ नये; पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांचे आवाहन



दैनिक आपला विदर्भ

**यवतमाळ/प्रतिनिधी :** ३१ डिसेंबर व नववर्षाच्या अनुषंगाने पोलीस प्रशासन सज्ज झाले आहे. यासाठी २०० पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा बंदोबस्त राहणार असून सायंकाळी सात ते रात्री तीन वाजेपर्यंत पोलीस बंदोबस्त तैनात असणार आहे. कोणीही मद्य प्राशन करून वाहन चालवू नये किंवा गैर कृत्य करू नये असे आवाहन पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी केले आहे.

### नववर्षाच्या पहिल्या दिवशी गजानन महाराजांचे दर्शन घेण्यासाठी अकोल्यातून भाविक शेगावकडे रवाना



दैनिक आपला विदर्भ

**अकोला/प्रतिनिधी :** २०२४ चा शेवटचा दिवस आहे उद्यापासून नवीन वर्ष सुरु होणार आहे. नववर्षाचं ठिकठिकाणी वेगवेगळ्या पद्धतीने स्वागत केले जाते. अकोल्यातील नागरिक हे अकोला ते शेगाव असा ४० किलोमीटर पायी प्रवास करत शेगावला जात आहेत. हे नागरिक रात्री १२ वाजता नवीन वर्षाच्या पहिला दिवसाची सुरुवात गजानन महाराजांचे दर्शन घेऊन करणार आहेत. हे नवीन वर्ष सुख, समृद्धी, आनंद आणि भरभराटीचे जावो यासाठी दरवर्षी अकोलेकर गजानन महाराजांचे दर्शन घेतात.

### सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त मेगा होमिओपॅथी शिबिराचे आयोजन

दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त रिसोड येथे डॉ समीर काळे एमडी यांच्या श्री होमिओपॅथी हॉस्पिटल रिसोड तर्फे मेगा होमिओपॅथिक शिबिर चे आयोजन ३ जानेवारी २०२५ सकाळी दहा ते पाच वाजेपर्यंत श्री होमिओपॅथी हॉस्पिटल रिसोड येथे आयोजित करण्यात आले आहे सदर शिबिरामध्ये पंधरा दिवस मोफत औषधोपचार प्रगत होमोपॅथी उपचार प्रत्येक रुग्णासाठी वैयक्तिक उपचार योजना फक्त पन्नास रुग्णांना प्रवेश असून सदर शिबिरामध्ये संधिवात व सांधेदुखी वातविकार थायरॉईड पीसीओडी मूत्रपिंडातील खडे व मूत्रपिंड विकार सोरायसिस व त्वचारोग कर्करोग वंधत्व वरील सर्व आजारांवर मोफत उपचार करणारे येणार असून जास्तीत जास्त रुग्णांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन डॉ समीर काळे एमडी,डॉ के डी हरणे एमडी स्कॉलर,डॉ श्रवेता अनिल बैस यांनी केले आहे.

### गुरुवारपासून जिल्हास्तरीय चाचा नेहरु बाल महोत्सव

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयामार्फत शासकीय व स्वयंसेवी बालगृहातील मुलांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा यासाठी जिल्हास्तरीय चाचा नेहरु बाल महोत्सव-२०२४-२५ चे आयोजित करण्यात आले आहे. हा महोत्सव दि. २ ते ४ जानेवारी २०२५ या कालावधीत शरद कला महाविद्यालय, चिखली रोड बुलढाणा येथे होणार आहे. या महोत्सवाचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी अमोल ज्ञा. डिघुळे यांनी केले आहे.

# कब्रस्तान कंपाउंड वॉलचे माजी आ. संजय रायमुलकर यांच्या हस्ते उद्घाटन

दैनिक आपला विदर्भ





**मेहकर/प्रतिनिधी** :मेहकर तालुक्यातील अंजनी बुद्रुक येथे माजी आमदार संजय रायमुलकर यांच्या विकास निधीमधून मुस्लिम समाज बांधवांच्या कब्रस्तान कंपाउंड वॉलचे उद्घाटन माजी आमदार संजय रायमुलकर यांच्या हस्ते करण्यात आले आमदार निधी मधून अजनी बुद्रुक येथील मुस्लिम समाज बांधवांच्या कब्रस्तानसाठी वीस लाख रुपयाचा निधी कंपाउंड वॉल साठी देण्यात आला आहे त्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले.

यावेळी माजी सभापती जुने शिवसैनिक सुरेशराव आढाव हे मार्गदर्शन करत होते यावेळी मार्गदर्शन करत असताना झालेल्या विधानसभा निवडणुकीत रायमुलकर साहेबांचा झालेला पराभव हे मेहकर मतदार संघाचे दुर्दैव असल्याचे त्यांनी सांगितले तर भाषण करत असताना सुरेशराव आढाव हे भावनिक होऊन त्यांचे अश्रू अनावर झाले एवढा चांगला माणूस २४ तास घरदार सोडून जनतेच्या सेवेमध्ये राहणारा माणूस म्हणजे रायमुलकर साहेब व अशा माणसाचा विधानसभेत कोणतीही चूक नसताना पराभव होतो हे मेहकर मतदार संघाचे दुर्दैवच म्हणावे लागेल यावेळी सुरेशराव आढाव हे मात्र चांगलेच भावनिक होऊन त्यांना अश्रू आवरता आले नाही.

या कार्यक्रमाला सरपंच, किरण पारिस्कर, माजी सभापती सुरेशराव आढाव, डॉ वसंत नागोलकर, ता उपप्रमुख समाधान साबळे,माजी सभापती बाबूराव नागोलकर, माजी सरपंच अरुण लाड, उध्दव आल्हट, गजानन नागोलकर, राम राऊत, विजय आढाव, रमेश जाधव, विलास आल्हट, विजयजी आल्हट, श्रीराम नागोलकर, संजय जाधव अरविंद जोशी सह शेकडो ग्रामस्थ हजर होते शेख एजाज शेख कासम अफरोज अली शेख अलीम शाहरुख पठाण कलीम मामू रियाज अली गफूर बेग फेरोज पठाण अहेमद अली गजानन तडस, दिलीप आढाव, प्रकाश खोडवे यांच्यासह गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अकोल्यात रंगीबेरंगी फुलकोबीची लागवड; २६ वर्षीय तरुण शेतकऱ्याचा धाडसी प्रयोग

दैनिक आपला विदर्भ



**अकोला/प्रतिनिधी :** अकोला जिल्हात पहिल्यांदाच रंगीबेरंगी फुलकोबीची लागवड करण्यात आली आहे. बीएससीचं शिक्षण घेतलेल्या २६ वर्षीय तरुणाने हा प्रयोग केला आहे. यात पिवळा, पांढरा, हिरवा, गुलाबी, केशरी अशा आठ रंगाच्या फुलकोबीची लागवड करण्यात आली आहे. अकोला जिल्ह्यातील तेल्हारा तालुक्यातील माळेगाव बाजार येथील अंकित उत्तम म्हसाळ असे या कोबी उत्पादक शेतकऱ्याचे नाव आहे.

अंकित आणि त्याचे वडील उत्तम म्हसाळ यांनी ३ एकरात विविध रंगाच्या फुलकोबीची लागवड केली आहे. तर यांना एकरीमागे १ लाख रुपयांपर्यंत लागवड खर्च लागला असून त्यातून म्हसाळ यांनी एकरीमागे ३ लाख रुपये उत्पन्न घेत आहे. तर अवघे तीन महिन्यात ३ एकरातून नऊ लाखाचे उत्पन्न घेतले आहे. विशेष म्हणजे या रंगीबेरंगी फुलकोबीचे सेवन करण्याचे अनेक फायदे असल्याचेही या शेतकऱ्याने सांगितले आहे. पांढरी फुलकोबी, केशरी फुलकोबी, जांभळी फुलकोबी, ब्रोकोली, हिरवी फूलकोबी, लाल पत्ताकोबी, हिरवी पत्ताकोबी आणि लेट्यूसचा यात समावेश आहे. ब्रोकलीला १०० ते १५० किलोप्रमाणे बाजारात भाव मिळत आहे. तर केशरी आणि गुलाबी फुलकोबीला १०० ते १२० किलोप्रमाणे भाव मिळत आहे.

### नागपूरचे पोलीस आयुक्त रवींद्र सिंगल यांनी नागपूर शहरातील नागरिकांना वाहतुकीचे नियम पालन केल्याबद्दल दिले शुभेच्छा कार्ड

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** नवीन वर्षाच्या पूर्व संध्येला नागपूर पोलीस आयुक्त रविंद्र सिंगल यांनी वाहतूक नियम पालन करणाऱ्या नागरिकांना शुभेच्छा संदेश यासोबतच त्यांनी गुलाबाच्या फुल व शुभेच्छा कार्ड वाटप केले आहे. या कार्डवर नागपूर शहरातील नागरीकांसाठी शुभेच्छा संदेश लिहिले आहे. त्याचा आशय या प्रमाणे आहे की, तुम्ही वाहतुकीचे नियम नीट पाळताना, हेल्मेट घालताना, बाहतुकीच्या नियमांची काटेकोरपणे अमलबजावणी करताना आणि योग्य प्रकारे वाहन चालवताना दिसतात. हे निश्र्चितच अनुकरणीय आणि कौतुकास्पद आहे. भावी वाटचाली करिता आपल्याला नागपूर पोलिसांतर्फे शुभेच्छा.अशा पधध्दतीचा आशा हे नविन वर्षेच शुभेच्छा कार्ड नागपूर पोलीसांनी नागरिकांना दिली आहे.

## ओला व सुका कचरा व्यवस्थापन कार्यशाळा संपन्न



दैनिक आपला विदर्भ

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** चंद्रपूर महानगरपालिका स्वच्छता विभागातर्फे स्वच्छता कर्मचारी व वॉर्डसखींसाठी आयोजित करण्यात आलेली ओला व सुका कचरा व्यवस्थापन कार्यशाळा उत्साहात पार पडली.याप्रसंगी मोठ्या प्रमाणात स्वच्छता कर्मचारी व वॉर्डसखींनी सहभाग दर्शविला.

सोमवार ३० डिसेंबर रोजी स्वच्छ भारत अभियान २.० व स्वच्छ संरक्षण २०२४-२५ अंतर्गत भिवापूर वॉर्ड येथील तिरुमला भवन येथे झालेल्या कार्यशाळेत घर ते घर कचरा वर्गीकरण कसे करावे व कचऱ्यापासुन कंपोस्ट खत कसे तयार करावे याचे प्रशिक्षण उपस्थितांना देण्यात आले. त्याचप्रमाणे स्वच्छतेविषयी जागरूकता वाढावी व त्यायोगे आपले शहर,नदी प्रदूषण मुक्त करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

स्वयंसे वकांनी स्वच्छता दूत म्हणून समाजात काम केले पाहिजे.स्वयंसेवक म्हणून प्रबोधनातून प्लास्टिक बंदी केली पाहिजे.'स्वच्छता अँप' याविषयी माहिती देऊन वापरण्याचे आवाहन चंद्रपूर पालिकेचे आयुक्त विपीन पालीवाल,अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील,उपायुक्त मंगेश खवले यांनी यावेळी केले.स्वच्छता मोहिमेत कचरामुक्त परिसर करण्यासाठी आपण सर्वांनी करण्याचे आवाहन करत डॉ.अमोल शेळके व सहकाऱ्यांनी प्रत्यक्ष प्रात्यक्षिकातून या कार्यशाळेचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले.

## चंद्रपुरात चार वाघनखांसहित दोघांना अटक

दैनिक आपला विदर्भ





**चंद्रपूर/प्रतिनिधी :** चंद्रपूर शहरातील लोहारा येथे ४ वाघनखे सहित २ आरोपीना वनविभागाने ३० डिसेंबर रोजी अटक केली असून या प्रकरणी काही आरोपी पसार आहे. जिल्ह्यातील ताडोबा अभयारण्यात असंख्य वाघ वास्तव्यास आहे. वर्ष २०२४ मध्ये २० वाघ तर १७ बिबट्याचा मृत्यू झाल्याची नोंद आहे. यामध्ये बरेचसे वाघ हे दोन वाघांच्या झुंजीत तर इतर वाघाचा मृत्यूचे कारण हे अस्पष्ट आहे.

चंद्रपुरातील वनपरिक्षेत्र अधिकारी जी.आय.नायगामकर यांना वाघनखांच्या अवैध व्यापाऱ्यांची माहिती मिळाली होती, त्या आधारे ३० डिसेम्बर रोजी सापळा रचत लोहारा येथील संदीप हरी तोडासे, शेखराम किसन तोडासे या दोघांना ४ वाघनखांसहित अटक करण्यात आली. सदर वाघनखे हे अवैध व्यापारासाठी आणल्याचे निष्पन्न झाले, आरोपीना अटक करीत त्यांना न्यायालयात हजर करीत २ दिवसांची वनकोठडी घेण्यात आली. सदर प्रकरण हे वन्यजीव संरक्षणाच्या दृष्टीने अत्यन्त गंभीर स्वरूपाचे आहे, या प्रकरणी आरोपीची संख्या मोठी असू शकते, सध्या या प्रकरणाचा तपास सुरू असून आरोपीनी वाघाची शिकार केली का? याबाबत आरोपीची कसून चौकशी सुरू असल्याची माहिती सहायक वनसंरक्षक विकास तरसे यांनी दिली.

### खामगाव शहरात पोलिस आणि स्वराज्य फाऊंडेशन सामाजिक संघटनांकडून मोफत दूध वाटप; नवीन वर्षाच्या स्वागतासाठी तरुणाईला संदेश देण्यासाठी उपक्रम

**खामगाव/प्रतिनिधी** :नवीन वर्षाचे स्वागत हे मध्य प्राशनाने नसून दूध पिऊन करावं मध्य प्रश्र्न करून वाहन चालवू नये... असा संदेश देत आज बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव शहरातील स्वराज्य फाऊंडेशन सामाजिक संघटनेने तरुणांना दूध वाटपाचा कार्यक्रम हाती घेतला आहे. अनेकदा ३१ डिसेंबरच्या रात्री तरुण मुलं हे दारू पिऊन वाहन चालवतात किंवा धिंगाणा घालतात त्यामुळे नवीन वर्षाचे स्वागत करताना तरुणाईने काळजी घ्यावी व मध्यापान न करता दूध पिऊन नववर्षाचा स्वागत करावं असा संदेश देत खामगाव शहर पोलीस व सामाजिक संघटनांनी शहरात तरुणांना दूध वाटपाचा कार्यक्रम हाती घेतला आहे..




## उमरखेडमध्ये चरस-गांज्याच्या विक्रीविरुद्ध युवक आंदोलन सक्रीय; युथ मुव्हमेन्ट ऑफ महाराष्ट्र ने गृहमंत्र्यांना दिले निवेदन

दैनिक आपला विदर्भ



**उमरखेड/प्रतिनिधी :** उमरखेड येथे चरस आणि गांजा यांची बेकायदेशीर विक्री वाढल्याने चिंता व्यक्त करत, युथ मूव्हमेंट ऑफ महाराष्ट्राच्या उमरखेड शाखेने राज्य सरकारकडे तक्रार दाखल केली आहे. या संघटनेने दावा केला आहे की, शहरातील विद्यार्थी आणि तरुण यांच्यात नशाचे प्रमाण वाढले आहे. या संघटनेने आपल्या पत्रात म्हटले आहे की, शहरातील काही विशिष्ट ठिकाणी रात्रीच्या वेळी तरुण जमा होऊन नशा करण्याचे प्रकार घडत आहेत. याबाबत स्थानिक पोलिसांना अनेकदा कळवूनही कोणतीही कारवाई झालेली नाही. या संघटनेने सरकारला विनंती केली आहे की, या प्रश्नाकडे गांभीरपणे लक्ष देऊन चरस आणि गांजाची बेकायदेशीर विक्री थांबवण्यासाठी कठोर कारवाई करावी. तसेच, यामागे काम करणाऱ्या व्यक्तींवरही कारवाई करावी .शहरात नांदेड रोड वरील खरब मैदान, बायपास रोड , जिल्हा परिषद शाळा मैदान, अस्तीत्वात आलेले नविन लेआऊटचे मैदान आदि ठिकाणी हा प्रकार सर्रास पणे चालू आहे . तरुण पिढी ही बरबाद होत आहे .यावर कठोर कारवाई होणे गरजेचे असल्याचे निवेदनात म्हटले आहे . सदर निवेदन हे राज्याचे गृहमंत्री , पोलीस महासंचालक, पोलीस अधिक्षक यांना उपविभागिय अधिकारी यांचे मार्फत देण्यात आले . निवेदन देतांना मो .साबिर शेख , काजिम अली , सोहेल खान , फैजान खान आदि कार्यकर्ते उपस्थित होते .

